लेखांक १६

सैतानाचे अखेरचे बंड

सैतानाला १००० वर्षांचे राज्य सुरू होण्यापूर्वी बांधून आगधकूपात बंदिवासात टाकले जाणार हे आपण पाहिले. आता १००० वर्षांच्या अखेरीस त्याला बंदिवासातून मुक्त करण्यात येईल. लागलीच तो पृथ्वीवरील सर्व राष्ट्रांसह यरुशलेमेविरुद्ध बंड पुकारील. मागे आपण पाहिले की, १००० वर्षांच्या राज्यात जन्मलेली अनुवंशिक पापामुळे पापाची आवड धरणारी ख्रिस्ताचा तारणारा म्हणून स्वीकार न केलेली प्रजा सैतानाच्या पक्षाच्या बंडात सामील होईल. पहा ही पापी मानवाची मनोवृत्ती. सैतानाच्या गैरहजेरीतही स्वैराचाराची आवड धरणारी. यावरून हेच अधोरेखित होते की मानवच आपल्या पापाला जबाबदार असतो. तो स्वत:च पापाची निवड करतो. सैतान सुटल्याची संधी साधून ते बंडात सामील होतील. ही घटना देवाची दुर्बलता दर्शवणारी नव्हे. देव त्याच्या शत्रूंचा विध्वंस करण्याची संधी साधून आपले सामर्थ्य प्रकट करील. त्यांना लढाईत सहभागी व्हायचे आहे. पण देव त्यांचा असा वध करील की ते नाश पावतील. या बंडातून दोन सत्ये समोर येतात.

१- सैतान आगाधकुपात बंदिस्त असताना अविश्वासी जनांची कपटी व अधम ह्रदये, ही प्राथमिक समस्या आपण पाहतो. सैतान हजर असो वा नसो, ही समस्या असतेच आणि येशू स्वत: हजर असतानाही आपल्या स्वतंत्र इच्छेने पापात राहून बंड करणेच ते निवडतात.

२- पांढऱ्या न्यायासनापूर्वीच देवाचे अधर्मावरील सामर्थ्य प्रत्ययास येते. प्रकटी २०:११ -१५ आणि नंतर सार्वकालिक अवस्थेस सुरुवात होते. प्रकटी २१:१-२२;५. मानवी इतिहासातील हे अखेरचे बंड असून देवाचे सामर्थ्य नाट्यमय रीतीने येथे प्रत्ययास येणार आहे.

सार्वकालिक अवस्था

मुक्ती पावलेल्या मानवजातीचे नवे आकाश व नवीन पृथ्वीवर वास्तव्य असणार. यावेळी
अ- एक हजार वर्षांचे राज्य संपलेले असणार.
ब- पांढऱ्या न्यायासनावरून होणारा न्यायही आटोपलेला असणार.
क- सैतान व सर्व अविश्वासी अग्निसरोवरात धाडलेले असणार.
ड- आता देवाचे लोक देवाच्या सान्निध्यातील ज्या गौरवी वास्तवाची वाट पहात होते, त्यात प्रत्यक्ष वसताना दिसतात. नवे आकाश व नवीन पृथ्वीची परिभाषा यशया ६५:१७; ६६:२२; २ पेत्र ३:१३ मध्येही आढळते. आपण वाट पाहत असलेली धार्मिकता तेथे प्रत्यक्ष वसत असणार. त्या वास्तव अवस्थेचे वर्णन आपण प्रकटी २१:१-२२:५ मध्ये वाचतो. पूर्वीचे आकाश व पृथ्वी आणि नवे आकाश व पृथ्वी यात काही साम्य व भेदही असणार आहेत. पण त्यातील वास्तव्य जुने आकाश व पृथ्वीवरील वास्तव्यापेक्षा वेगळे असणार आहे.

नवीन पृथ्वी

ती पूर्ण नवीन असणार की जीर्णोद्धार केलेली असणार? आहे त्या पृथ्वी व ग्रहांवर डागडुजी करून दुरुस्ती केलेली ती नसणार. २ पेत्र ३:७-१३ व प्रकटी २१:१ वाचा. पहिली पृथ्वी अग्निने सृष्टितत्त्वे तप्त होऊन पूर्ण वितळून निघून गेलेली असणार.

अ- सध्याची पृथ्वी अग्निसाठी राखून ठेवली आहे.

ब- अग्निने सृष्टीतत्त्वे तप्त होऊन विलयास जातील आणि पृथ्वीवरील सर्व गोष्टी उघडकीस येतील.

क – ती सर्व वितळून नष्ट होतील.

ड– आकाश जळून लयास जाईल.

तर सृष्टितत्त्वे तप्त होऊन वितळतील असेच घडणार. कारण येशू स्वत: मत्तय २४:३५ मध्ये दावा करतो की, 'आकाश व पृथ्वी ही नाहीतशी होतील पण माझी वचने नाहीशी होणारच नाहीत.' स्तोत्र १०२:२५-२६ मध्ये म्हटले आहे की 'ती नाहीशी होतील, जीर्ण होतील,..बदलून नाहीशी होतील.' यशया २४:२० म्हणते, 'पृथ्वी पडेल… पुन्हा उठणार नाही.' १ योहान २:१५ म्हणते की 'जग व त्याची वासना नाहीशी होत आहेत.'

पृथ्वीच्या नवीकरणाविषयी काही बाबी

१- रोम ८:१९-२१ नमूद करते की, निर्मिती म्हणजे सृष्टी देवाच्या पुत्रांच्या प्रकट होण्याची उत्कंठेने वाट पहात आहे. ती मानवाच्या पापामुळे भ्रष्टतेच्या स्वाधीन करण्यात आली होती. तिची भूमी, तिच्यावरील वनचर व सजीवांनाही शाप आला होता. तरी तिलाही आशा आहे की एक दिवस तीही भ्रष्टतेच्या बंधनातून मुक्त होईल व देवाच्या पुत्रांप्रमाणे गौरवी बनेल. यावरून पृथ्वी तिच्या जिर्णोद्धाराची नव्हे तर गौरवीकरणाची वाट पहात आहे.

२- येथे सृष्टीच्या गौरवीकरणाची देवाच्या मुलांच्या गौरवीकरणाशी सांगड घातली आहे, रोम ८:२३. विश्वासी जनांच्या शरीराचा जीर्णोद्धार होणार नाही तर ते येशूप्रमाणेच कबरेतून उठून गौरवी शरीराने पुनरुत्थित होणार आहेत. आताची विश्वासी व्यक्ती व पुनरुत्थित झाल्यावरची तीच व्यक्ती यात एकास एक परस्पर संबंध आहे. मानवाच्या पतनामुळे निर्मिती आता त्या पतनाचे दु:खद परिणाम भोगत आहे. त्यामुळे ही निर्मिती देवाच्या लोकांच्या मानवी शरीराचे होणाऱ्या गौरवीकरणाप्रमाणेच उपभोग घेणार.

३- मत्तय १९:२८ मध्ये येशूने केलेल्या भाकितातील 'भावी पुनरुत्पत्तीत' हे शब्द पृथ्वीच्या नवीकरणाचेच संकेत देतात. प्रे. कृ ३:२१ मधील 'सर्व गोष्टी पूर्वस्थितीला पोचण्याच्या कालाविषयी' हा शब्दप्रयोग कल.१:२० मधील येशूच्या रक्तामुळे पृथ्वी व स्वर्गातील जे काही आहे त्याचा देवपित्याशी झालेल्या समेटाची भाषा करून हे विश्व संपूर्ण नवीकरणाच्या दिशेने जात असल्याचे इशारे देतो. उत्पत्ती १:३१ प्रमाणे ती पुन्हा देव 'बहुत चांगली' करणार व सैतानावर अंतिम विजय पावणार आहे. २ पेत्र ३ :१०-१३ मधील जलप्रलयाने झालेला नाश व हा नाश यातील भेद स्पष्ट केला आहे. मलाखी ३:२-३ नुसार येणारा हा न्याय पृथ्वीचे अग्निने शुद्धीकरण करील.

नवीन पृथ्वीवरील जीवन

तेथे विश्वासी लोक प्रत्यक्ष शरीराने वास करतील असे नवी पृथ्वी हे दृश्य स्थल असणार. देवाने माणसाला असे घडवले आहे की तो जीव आत्मा व शरीर यांच्या संयोगाने दृश्य स्वरूपातील वातावरणात राहू शकेल. त्यामुळे मनुष्य अशाच वातावरणाच्या नवीन पृथ्वीवर कायमचे वास्तव्य करील. त्या सार्वकालिक अवस्थेची ठळक वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे असतील. प्रकटी. अध्याय २१;२२ वाचा.

१- नवे आकाश व नवी पृथ्वी	२- नवे यरुशलेम
३- देवाचे लोक (२१:३).	४- नवी दया (२१ :४).
५- नवीन व्यवस्था	६- नवीन मंदिर (२१:२२).
७ - नवा प्रकाश (२१:२३).	८- नवी प्रजा {२१:२४-२७}.
९- नवीन जीवन (२२: १-२).	१०- नवीन गौरव २२:३-४.

नव्या पृथ्वीची राजधानी नवीन यरुशलेम असेल. हे खरेखुरे प्रत्यक्ष नगर असेल. तेथे देव स्वत: त्यांच्या सोबत वस्ती करील. तेथील मापाप्रमाणे ते असेल. मौल्यवान पाषाण व धातूंनी ते असेच सजवून सुशोभित केलेले असेल. पायाही जवाहिऱ्यांनी नटवलेला असेल. तरीही हे सौंदर्य व ऐश्वर्य गौरवी नगराच्या वैभवापासून लक्ष विचलित करणारे नसेल. पिता व येशू तेथे कार्यरत असतील. देवाच्या प्रकाशाने नगर उजळलेले असेल. त्यामुळे सूर्य व चंद्राच्या अस्तित्वाची तेथे गरजच नसणार. राष्ट्रे व राजे त्या प्रकाशात चालतील व त्यांचे वैभव तिच्यात आणतील. म्हणजे प्रत्यक्षात राष्ट्रे नवीन पृथ्वीवर अस्तित्वात असतील. म्हणून तेथे राजेही असल्याचे दिसते. त्यांची कामे यरुशलेमेच्या बाहेर चालू असतील. तारण झाल्यामुळे सर्व देवाचे लोकच असतील. पण नवीन पृथ्वीवर भिन्न भिन्न राष्ट्रे अस्तित्वात असतील. त्यांच्या संस्कृतीचे उत्तमोत्तम सादरीकरण तेथे होत राहील (२१:२४-२७). ही राष्ट्रे पूर्ण ऐक्याने वस्ती करतील. जीवनाच्या झाडाचे उत्पत्ती ३ मधील मानवाच्या पतनानंतर येथे प्रथमच आपल्याला दर्शन घडते. त्या झाडाची पाने राष्ट्रांना आरोग्य देण्याचे काम करत राहतील. ते बारमाही फळ देत राहील. म्हणजे पृथ्वीवर मोसमांचे नवीन कालमापन दिसते (२२:२). नगराच्या वेशी सतत उघड्या असल्याने नगरात प्रवेश करायला मज्जाव नसेल. रात्र अस्तित्वातच नसेल. देवापासून व येशू या कोकऱ्यापासून सतत जीवनाची नदी वाहत राहील.

नगरातील सौंदर्याचे विशेष आकर्षण म्हणजे सिंहासनावरील देवाचे व कोकऱ्याचे सान्निध्य होय. देवाचे सेवक त्याची आराधना करतील व त्याला तोंडोतोंड पाहातील. त्यांची सर्वकाळ अतूट सहभागिता राहील. देव व त्याचे लोक यांच्यामध्ये कसलेच अडखळण राहणार नाही. पवित्र जन युगानुयुग राज्य करतील (२२:५). सैतानाकडून फसवणूक होण्याचा प्रश्नच नसेल की तेथे पापाचा अंशही नसेल. प्रत्येक व्यक्ती कोकऱ्याच्या रक्तात धुतलेली व कोकऱ्याची स्वेछेने सेवा करणारी असेल. दुर्जनांचा त्या नगरात प्रवेश होणारच नाही. हा देवाच्या लोकांचा उत्तम शेवट असेल.

विश्वासीयांची ज्या वाटेने वाटचाल चालू आहे ती काही परिकथा नाही. सध्याच्या वास्तव्याप्रमाणे ते पवित्र प्रत्यक्षातील खरेखुरे वास्तव्य असणार. या युगात ख्रिस्ती लोक देवाची सेवा का करतात याचे या अभ्यासात उत्तर

मिळते. आजचे पतित जग सर्वकाळ टिकणार नाही. पाप, शाप, मरण ही सर्वकाळासाठी दूर केली जातील. मानवाचे व सृष्टीचे देवाबरोबरचे डागाळलेले संबंध पूर्णपणे पुनरुज्जीवित केले जातील. शेवटल्या काळातील सर्व घटनांचा हा कळस आहे. बायबलमधील महाकथेचे हे चित्तथरारक सत्य निर्णायक आहे. म्हणून या कथेच्या अंतास आम्ही असा हृदयद्रावक प्रतिसाद देतो की, आम्ही उत्सुकतेने तत्परतेने त्यासाठी नेटाने क्रियाशील राहू . प्रेषित योहानासह आम्ही म्हणतो की, 'ये, प्रभू येशू, ये.'

प्रश्नावली

प्रश्न १ला- पुढील प्रश्नांची उत्तरे द्या.

१- कोण लोक शेवटच्या बंडात सामील होणार असतील?

२- वरील घटनेवरून कोणती गोष्ट अधोरेखित होते?

३- याचा कोणता परिणाम त्या लोकांना भोगावा लागेल?

४- या बंडातून कोणती दोन सत्ये पुढे येतात?

५- नवीन आकाश व पृथ्वीवर मुक्ती पावलेल्यांचे वास्तव्य होण्यासाठी कोणत्या चार गोष्टी घडलेल्या असणार?

६- या पृथ्वीचा शेवट होताना कोणत्या चार प्रक्रिया होतील?

७- मत्तय २४:३५ मध्ये येशू कोणता मोठा दावा करतो?

८- सृष्टी कशाची व का वाट पाहत आहे?

९- मानवाच्या गौरवीकरणाची सृष्टीशी कशी सांगड घालाल?

१०- 'सर्व गोष्टी पूर्वस्थितीला पोहोचण्याच्या काळाविषयी' हा प्रे कृ ३:२१ मधील शब्दप्रयोग कलसै १:२० नुसार काय सांगतो ?

११- २ पेत्र ३:१०-१३ मध्ये अप्रत्यक्षपणे कोणता भेद स्पष्ट केला आहे? कसा?

१२- मनुष्याला नवीन पृथ्वीवर राहाण्याजोगे कसे घडवले आहे?

१३- नवीन पृथ्वीवरील जीवनाच्या १० वैशिष्ट्यांची यादी करा.

१४- नव्या यरुशलेमातील पृथ्वीवरील राष्ट्रांविषयी काय समजते?

१५- जीवनाच्या झाडाविषयी आपल्याला काय माहिति मिळते?

१६- त्या नगराच्या सौंदर्याचे विशेष आकर्षण काय असेल?

१७- शेवटल्या काळातील सर्व घटनांचा कळस काय आहे?

प्रश्न २ रा- चूक की बरोबर सांगून चुकीची विधाने दुरुस्त करा.

१. शेवटी जुने आकाश व पृथ्वीची डागडुजी व दुरुस्ती करून जीर्णोद्धार केला जाईल.-----

२. सृष्टी तिच्या जीर्णोद्धाराची नव्हे तर गौरवीकरणाची वाट पहात आहे.--------

३. मानवाच्या पतनाच्या वेळी सृष्टीला शाप देण्यात आला नव्हता.-------

४. विश्वासीयांच्या शरीरांचा जीर्णोद्धार होणार आहे.--------

५. नवीन पृथ्वीवर राष्ट्रे आपले वैभव प्रभूपुढे सादर करतील.------

प्रश्न ३रा –विवेचांनानुसार नवीन पृथ्वीवरील जीवनाचे वर्णन करणारी विधाने कंसातील शब्दांच्या आधारे पूर्ण करा.

(पांढऱ्या आसनाचा, वास्तव्य, गौरवीकरणाची, राजधानी, नवीकरणाचे, शुद्धीकरणासाठी, सामर्थ्य, विजय, भेद, अखेरीस, जीर्णोद्धाराची, प्रत्ययास, सार्वकालिक, बहुत चांगली, युद्ध, मुक्ती पावलेल्या, बंदीवासातून, सुरुवात, यरुशलेम, जलप्रलयाने)

१. १००० वर्षांच्या ----- सैतानाला -------- मुक्त करण्यात येईल. लागलीच तो पृथ्वीवरील सर्व राष्ट्रांसह------- विरुद्ध ----- पुकारील,

२- हे मानवी इतिहासातील अखेरचे बंड असून देवाचे-------- नाट्यमय रीतीने ----- येईल.

३- आधी ------- न्याय आणि नंतर-------अवस्थेस ---- होईल.

४- ------- मानवजातीचे नवे आकाश व पृथ्वीवर ------- असणार.

५- सृष्टी तिच्या ---- नव्हे तर -------- वाट पहाट आहे.

६- 'पुनरुत्पत्ती' हा शब्द पृथ्वीच्या ------- संकेत देतो.

७- देव पृथ्वी पुन्हा ------करणार व सैतानावर --------पावणार आहे

८- पृथ्वीचा ----- नाश व पुढे अग्निने होणारा नाश यात------- आहे. हा न्याय तिच्या ------ असेल.

९- नवीन पृथ्वीची नवे यरूशलेम ही -------- असेल.

प्रश्न ४ था- पुढील संदर्भ वाचून रिकाम्या जागा भरा.

(प्रकटी २०: ११-१५; यशया २४:२०; ६५ :१७; ६६:२२; २पेत्र ३:१३; स्तोत्र १०२:२५-२६; १ योहान २:१५-१७; रोम ८;१९-२१;)

१. ------देवाच्या -------च्या ------ होण्याची------ अत्यंत------ने -----करीत आहे.

२. ज्यामध्ये ------ ------ करते असे ---- ----- व ---- ---- ह्यांची त्याच्या ----- प्रमाणे आपण ---- पाहत आहो.

३. भूमी ----- सारखी ----- खात आहे.------ सारखी ----- आहे. तिच्या ---- चा ---- तिला ---- आहे. ती --- आणि पुन्हा ------ नाही.

४. त्यावेळी ---- उघडली गेली. एक पुस्तक ----- गेले ते ---- होते,

५. ------- च्यी गोष्टी कोणी ------ नाही. त्या ---- च्या ---- येणार नाहीत.

६. ------ तुझ्या -----चे ----- आहे. ती ---- होतील पण तू ---- आहेस. ती ----- सारखी --- होतील. ती तू ----- सारखी बदलशील.

७- मी ----- व --- पृथ्वी ------ करीन, ती जशी --------समोर -------राहतील तसा तुमचा ---- व तुमचे ------ टिकून राहील.

८. ---- ने आपल्यामधील ----- मनुष्यांस ------ सोडले .----- व ------- ह्यांनी आपल्या -------स ----सोडले. आणि --------त्यांच्या ------- प्रमाणे -------- चा ---- ठरवण्यात आला.

९. ------ जे आहे ---- सर्व म्हणजे ----- ची -----, -----ची ------ व ------- विषयीची ------- ही ---- पासून नाहीत तर ----- पासून आहेत.

१०. ज्या ----- चे नाव ----- च्या ------ लिहिलेले----- नाही तो ---- च्या ------ टाकला गेला.

११. ---- व त्याची -------ही ---- होत आहेत. पण ----- च्या ----- प्रमाणे करणारा----- राहतो.

समाप्त